जनप्रवास दि. 12/02/2024

# विद्यापीठाचा नेमबाजी संघ 'खेलो इंडिया'साठी पात्र

## ▪ सांगली के.डब्लू.सी.च्या श्रेयस उपाध्येचा समावेश

**जनप्रवास । सांगली**

अखिल भारतीय विद्यापीठ नेमबाजी स्पर्धेत यश मिळविणारा शिवाजी विद्यापीठाचा संघ अखिल भारतीय 'खेलो इंडिया' साठी पात्र ठरला. गुवाहाटी येथे २१ ते २७ फेब्रुवारी ही स्पर्धा होणार आहे.

कुरुक्षेत्र (हरियाणा) येथे झालेल्या अखिल भारतीय विद्यापीठ स्पर्धेत ज्ञानेश्वरी पाटील हिने १० मीटर एअर रायफल प्रकारात वैयक्तिक कास्यपदक मिळवले. तिने ६५४ पैकी ६३०.३ गुण मिळवले. ती विवेकानंद महाविद्यालयाची विद्यार्थिनी आहे. पिस्तूल मिक्स शूटिंग संघाने कांस्य पदकाची कमाई केली. संघाने ६०० पैकी ५७२ गुण मिळवले. शहाजी छत्रपती महाविद्यालयाच्या फिझा देसाईने ३०० पैकी २८४, तर के डब्ल्यू. एस. कॉलेजच्या श्रेयस उपाध्येने ३०० पैकी २८८ गुण पटकावले. कॉमर्स कॉलेजचा आदित्य साळुंखे, तर लहू बाळा परित्रकर महाविद्यालयाने सुमेध सासने, प्रतीक जोंग १० मीटर रायफलसाठी पात्र ठरले आहेत. विवेकानंदच्या ज्ञोनेश्वरीसह ऐश्वर्या पोवार, गौरी कांबळे याही स्पर्धेसाठी पात्र ठरल्या. त्यांना प्रशिक्षक डॉ. नीलेश पाटील, डॉ. धनंजय पाटील, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, प्र- कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. पी. टी. गायकवाड यांचे प्रोत्साहन मिळाले.




**शिवाजी विद्यापीठातील अखिल भारतीय 'खेलो इंडिया'साठी पात्र ठरलेले यशस्वी विद्यार्थी.**

13/02/24

13.2.24

मुंबई, ठाणे, पालघर येथून प्रसिद्ध आणि रायगड, रत्नागिरी, पुणे, नाशिक येथून वितरीत

द ग्लोबल टाइम्स

मराठी दैनिक

भारतीय समाज मनाचे प्रतिबिंब

Register No. : RNI - MAHAMAR /2012/44621 मुंबई अंक : ३१ वर्ष : १२

Web Site : www.theglobaltime.com सोमवार दि. १२ फेब्रुवारी २०२४ पाने : ०८ किंमत : ₹ ३.००

# विवेकानंद कॉलेजमध्ये जागतिक कडधान्य दिन साजरा



कोल्हापूर : विवेकानंद कॉलेज वनस्पतीशास्त्र विभागाच्यावतीने विभाग प्रमुख डॉ. बी. टी. दांगट यांचा मार्गदर्शनाखाली जागतिक कडधान्य दिनानिमित्त वनस्पतींची पाने, फुले व बियांपासून बनवलेले अलंकारांचे प्रदर्शन भरवून जागतिक कडधान्य दिन साजरा करण्यात आला.

आजच्या जीवनशैलीत लोक फास्ट फूड आणि फ्रोझन फूडला जास्त महत्त्व देऊ लागलेत. त्यामुळे आपल्या आहारात डाळींचा वापर कमी होत आहे. त्यामुळे शरीराला पूर्ण पोषण मिळत नसून त्याचे दुष्परिणाम लोकांच्या विशेषत: लहान मुलं व तरुणांच्या आरोग्यावर होत आहेत. लोकांच्या आरोग्यासाठी आणि अन्नसुरक्षेसाठी डाळी किती महत्त्वाच्या आहेत, ही बाब लोकांपर्यंत पोहोचावी आणि डाळींचा आहारात समावेश करण्यासाठी जनजागृती व्हावी, या उद्देशाने आंतरराष्ट्रीय कडधान्य दिन साजरा करण्यात आला.

या प्रदर्शनाचे उद्घाटन विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे हस्ते झाले. या प्रदर्शनास विद्यार्थी व प्राध्यापकांचा चांगला प्रतिसाद मिळाला. विद्यार्थ्यांनी या प्रदर्शनामध्ये ख्रिसमस ट्री ची पाने, विविध प्रकारचे कडधान्य, शेंगा व बिया, विविध प्रकारचे मसाले, ड्रायफ्रुट्स यांचा वापर करून कर्णफुले, हार, ब्रेसलेट इत्यादी विविध अलंकारे बनवून प्रदर्शन भरवले होते, कडधान्यांमधील पोषक घटक व त्याचा फायदा यासंदर्भात जनजागृती करण्याच्या उद्देशाने हे प्रदर्शन भरवण्यात आले. प्रदर्शनास गणितशास्त्र विभाग प्रमुख प्रा. एस. पी. थोरात व लेफ्टनंट जे. आर. भरमगोंडा यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

12/02/24

14/2/24